


दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

उद्याचा रंग आहे, जांभळा

वर्ष : ०६ | अंक : ६४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.१७ ऑक्टोबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# दिवाळीनंतर महायुतीत भडका उडेल, होळीसोबत हे तिन्ही पक्ष आपआपसांत भांडताना जळतील

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, नागपूर :** महायुती सरकारमधील तीनही पक्षांमध्ये अंतर्गत वाद विकोपाला गेले असून, या भांडणांचा भडका दसरा-दिवाळीनंतर अधिक स्पष्टपणे पाहायला मिळेल. हे भांडण होळीपर्यंत सुरू राहील आणि तिकडे होळी जळेल आणि महायुतीतील तीन पक्ष आपापसांत भांडताना जळतील, अशा प्रकारची परिस्थिती महाराष्ट्रात पहायला मिळेल, असा हल्लाबोल काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

पुढे बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, महायुतीतील नेते एकमेकांविरुद्ध उभेत ठाकलेले आहेत, त्यांच्यात भांडणे सुरू आहेत. रोज दिल्लीतील वरिष्ठ नेतृत्वाकडे तक्रारींचा पाऊस सुरू झाला आहे. राज्यातील राज्यकर्ते अस्वस्थ आहे. फाईल अडवल्या जात आहेत. एकमेकांची जिरवली जात आहे. त्यातून हा उद्रेक मोठा होत आहे. यापूर्वी मोठ्या प्रमाणात जे घडत होते, त्यात आता जनतेची कामे होत नाहीत; फक्त घोषणा केल्या जात आहेत. पण कामे होत नाही विकासाचा नावावर घोषणा होत जाते, पण प्रत्यक्षात ते होत नाही. आता हे सर्व महाराष्ट्राला दिसत आहे. तर या भांडणाचे परिणाम राज्यातील जनता भोगत आहे, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

पुण्यात महाविकास आघाडीतील घटक पक्षांमध्ये सुरू असलेल्या वादाबाबत आणि उद्धव ठाकरे यांचा फोटो वापरल्यास कायदेशीर कारवाई करण्याच्या इशाऱ्याबाबत विचारले असता, वडेट्टीवार यांनी महायुतीतील अंतर्गत संघर्षाकडे लक्ष वेधले.

**दुष्काळी मदतीवरून सरकारवर निशाणा...**




दुष्काळी मदतीच्या मुद्द्यावरूनही वडेट्टीवार यांनी राज्य सरकारवर टीका केली. शेतकऱ्यांच्या संदर्भात या सरकारची दुटप्पी भूमिका आहे, हे सिद्ध झाले आहे. आता ही बाब लपून राहिलेली नाही. मुळात, एकीकडे ५ हजार रुपये देत असल्याचा ऐतिहासिक निर्णय घेतल्याची पाठ थोपटली जात आहे, तर दुसरीकडे नमो किसान योजनेचे दोन हप्ते थकवण्यात आले आहेत. ३७०० कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करायला पाहिजेत. एकीकडे आम्ही शेतकऱ्यांना अग्रीम मदत देतो, असे सांगायचे आणि दुसरीकडे शेतकरी सन्मान निधी बंद करायचा, असे दुहेरी धोरण यापूर्वी महाराष्ट्रात कधीही पाहिले नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पालकमंत्री असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील दहा तालुक्यांचा दुष्काळग्रस्तांच्या यादीत समावेश नसल्याचा दावा करत, संपूर्ण जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करण्याची मागणी त्यांनी केली. कर्नाटक सरकारने केंद्राच्या मदतीची वाट न पाहता स्वतःच्या तिजोरीतून शेतकऱ्यांना मदत केल्याचे उदाहरण देत, महाराष्ट्र सरकारनेही तातडीने मदत करावी, असे ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्रावर फार मोठे संकट आहे. आमचे काही शहाणे कर्नाटकचे उदाहरण देतात. कर्नाटकात कोणत्या जिल्ह्याला मदतीची गरज आहे, हे पाहून सरकारने तातडीने निर्णय घेतला. केंद्र सरकारची वाट न पाहता कर्नाटक सरकारने स्वतःच्या तिजोरीतून मदत केली. केंद्र सरकारने नेहमीच विरोधी पक्षांचे सरकार असलेल्या राज्यांबाबत दुजाभाव केला आहे. नरेंद्र मोदी यांच्या सरकारने कधीही खुल्या हाताने मदत केलेली नाही. मोदी सरकारच्या मदतीची वाट न पाहता काँग्रेस सरकारने कर्नाटकात स्वतःच्या तिजोरीतून मदत केली, असा दावा वडेट्टीवार यांनी केला.

दरम्यान, पशुधन योजनेत ८०० बोगस प्रकरणे समोर आल्याचा आरोप करत त्यांनी संबंधित प्रकरणांची चौकशी करण्याची मागणी केली. तसेच पीकविमा, वाढती महागाई आणि अपुरी दुष्काळी मदत या मुद्द्यांवरून सरकारला धारेवर धरले. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना पुरेशी मदत न मिळाल्यास सरकारला राज्यभर फिरणे कठीण होईल, असा इशाराही विजय वडेट्टीवार यांनी दिला.

# महाराष्ट्राच्या प्रादेशिक हवाई वाहतुकीला नवी चालना

**अक्षराज : जे. के. पोळ**




**दि.१६, मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'उडान' योजनेमुळे देशातील सर्वसामान्य नागरिकांसाठी हवाई प्रवासाची दारे खुली होत आहेत. या सुधारित योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील सोलापूर-मुंबई-सोलापूर आणि अमरावती-पुणे-अमरावती या हवाई मार्गांची निवड होणे ही आनंदाची बाब आहे. या मार्गांमुळे प्रादेशिक संपर्क अधिक सुलभ होण्यासोबतच व्यापार, पर्यटन आणि स्थानिक विकासालाही चालना मिळेल. प्रवासाचा वेळ कमी होऊन विद्यार्थी, उद्योजक आणि व्यावसायिकांसाठी नव्या संधी उपलब्ध होतील. महाराष्ट्राच्या विकासासाठी सातत्याने सहकार्य करणारे मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी तसेच मा. केंद्रीय मंत्री किंजरापू राम मोहन नायडूजी व केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचे मनःपूर्वक आभार.

# ग्रामसेवक संतोष पाटील यांच्या आत्महत्येने पंढरपुरात खळबळ

**अक्षराज : विकास सरवळे**



**दि.१६, पंढरपूर :** पंढरपूर शहरातील समतानगर परिसरात राहणारे आणि पंढरपूर तालुक्यातील तुंगत येथे ग्रामसेवक म्हणून कार्यरत असलेले संतोष पोपटराव पाटील यांनी आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात मृत्यूपूर्व चिठ्ठी आणि कुटुंबीयांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे चार जणांविरुद्ध पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांकडे दाखल झालेल्या प्रथम माहिती अहवालानुसार, १५ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी समतानगर परिसरात ही घटना घडली. त्यानंतर १६ ऑक्टोबर रोजी पोलिसांनी या प्रकरणाची नोंद केली. मृत संतोष पाटील यांचे मोठे बंधू श्रीकांत पोपट पाटील यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे.

फिर्यादीच्या जबाबानुसार, संतोष पाटील यांचा विवाह २००८ मध्ये झाला होता. नोकरीच्या निमित्ताने ते वेगवेगळ्या ठिकाणी वास्तव्यास होते. दरम्यान, कुटुंबातील आर्थिक व्यवहार आणि एका नातेवाइकासोबतच्या संबंधांवरून पती-पत्नीमध्ये वाद निर्माण झाल्याचा उल्लेख तक्रारीत करण्यात आला आहे. या वादातून संतोष पाटील आणि त्यांच्या पत्नीमध्ये वारंवार मतभेद होत असल्याचे फिर्यादीने नमूद केले आहे. काही काळ पत्नी माहेरी राहण्यास गेली होती. कुटुंबीयांनी मध्यस्थी करून दोघांमधील वाद मिटवण्याचा प्रयत्न केल्याचेही फिर्यादीच्या जबाबात म्हटले आहे. त्यानंतर पुन्हा वाद निर्माण झाल्याने पत्नी वेगळी राहू लागल्याचे तक्रारीत नमूद आहे. या कौटुंबिक परिस्थितीमुळे संतोष पाटील मानसिक तणावात असल्याचा दावा फिर्यादीने केला आहे.

**मृत्यूपूर्व चिठ्ठी सापडल्याचा FIR मध्ये उल्लेख**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संतोष पाटील यांच्या मृत्यूनंतर करण्यात आलेल्या कार्यवाहीदरम्यान त्यांच्या कपड्यांच्या खिशात मृत्यूपूर्व चिठ्ठी आढळली. ही चिठ्ठी पंचांसमक्ष जप्त करण्यात आल्याचे प्रथम माहिती अहवालात नमूद आहे. या चिठ्ठीत संतोष पाटील यांनी आपल्या वैवाहिक आयुष्यातील वाद, पत्नीपासून झालेला दुरावा आणि काही व्यक्तींविषयी आरोप केल्याचे फिर्यादीच्या जबाबात नमूद करण्यात आले आहे. तसेच, आपल्या आईच्या नावाने मालमत्तेसंदर्भातील अधिकार सोपवण्याबाबतही चिठ्ठीत उल्लेख असल्याचे FIR मध्ये म्हटले आहे.

**चौघांविरुद्ध गुन्हा दाखल !**

श्रीकांत पाटील यांच्या फिर्यादीनुसार, पत्नी, नातेवाईक आणि अन्य संबंधित व्यक्तींविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी चार जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८ आणि ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. सुषमा पोपट पाटील, विनोद रवींद्र पाटील रा. घारगाव तालुका करमाळा, वैशाली विजय सलगर आणि विजय सलगर राहणार पंढरपूर यांचे विरोधात कायदेशीर तक्रार देण्यात आली आहे.

# महासभेचे कव्हरेज करणाऱ्या पत्रकार आणि नागरिकांना मारहाण

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.१६, मिरा-भाईंदर :** मिरा-भाईंदर महापालिकेची महासभा सुरू असताना भाजप नगरसेवकाकडून सामान्य नागरिकांना झालेल्या मारहाणीचे चित्रीकरण करणाऱ्या पत्रकारांनाही नगरसेवकांनी मारहाण आणि शिवीगाळ केल्याचा प्रकार शुक्रवारी घडला. या घटनेवर पत्रकारांकडून आक्रमक भूमिका घेत, सर्व नगरसेवकांवर गुन्हा दाखल करण्याचे मागणी जोर धरू लागली आहे.

मिरा-भाईंदर पालिकेच्या महासभेचे आयोजन शुक्रवारी सकाळी करण्यात आले होते. यावेळी प्रेक्षकागृहात काही प्रेक्षक बसून मोबाईल हातात पकडून बसले होते. यावेळी संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याचे सत्ताधारी भाजपच्या महापौर डिंपल मेहता यांनी आदेश सुरक्षारक्षकांना आणि पोलिसांना दिले. महासभेचा पारदर्शक कारभार होणे अपेक्षित असतानाही त्याचे चित्रीकरण आणि व्हिडिओ काढण्यास गेल्या काही महिन्यांपासून सत्ताधारी भाजपकडून मनाई करण्यात आली आहे.

यादरम्यान भाजपचे शानु गोहिल ,नवीन सिंग , तरुण शर्मा, श्रद्धा कदम , रुपाली शिंदे -मोदी , वर्षा भानुशाली , दिपीका अरोरा भाजप कार्यकर्ता प्रियेश शहा व इतर काही नगरसेवक सभागृहाचे दालन सोडून प्रेक्षकागृहात शिरले आणि त्यांनी उपस्थित व्हिडिओ काढल्याचा गैरसमज असलेल्या नागरिकांना प्रथम धक्काबुक्की आणि शिवीगाळ सुरू केली. हा गंभीर प्रकार असल्याने त्याचे फोटो आणि व्हिडिओ हे स्थानिक पत्रकारांनी बातमीच्या अनुषंगाने काढण्यास सुरुवात केली. याचा राग मनात धरून भाजपच्या नगरसेवकांनी पत्रकारांवर चप्पल फेकली. इतक्यावरच न थांबता नंतर मारहाण आणि शिवीगाळ करत धमकावले. एका पत्रकाराचा मोबाईल देखील त्यांच्याकडून व्हिडिओ आणि फोटो काढले जात असल्याने ओढण्यात आला. यानंतर पत्रकारांनी आक्रमक भूमिका घेत सभागृहाबाहेरच ठिय्या आंदोलन सुरू केले आहे.



याप्रकरणी संबंधित सर्व नगरसेवकांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी आता होऊ लागली आहे. काँग्रेस, शिवसेना आणि मनसेकडूनही घडलेल्या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला असून कायदा हातात घेत सर्वसामान्य नागरिक आणि पत्रकारांवर हल्ला करणे ही लोकशाहीची हत्या असल्याची भूमिका व्यक्त करण्यात आली.

# पनवेल मनपाच्या चारही प्रभागात अतिक्रमणविरोधी जोरदार कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१६, पनवेल :** आयुक्त मंगेश चितळे यांच्या सुचनेनुसार पनवेल महानगरपालिकेच्या कामोठे, पनवेल आणि कळंबोली, खारघर परिसरातील अनधिकृत फेरीवाले, भाजी विक्रेते तसेच रस्ते आणि पदपथांवरील अतिक्रमणांविरोधात गेल्या काही दिवसांपासून कडक कारवाई सुरू आहे. या कारवाई दरम्यान काही ठिकाणी अनधिकृत व्यवसाय करणाऱ्या टेम्पो व हातगाड्या जप्त करण्यात आल्या, तर अनधिकृतपणे लावण्यात आलेल्या नर्सरी आणि इतर अतिक्रमणांवरही कारवाई करण्यात आली.




**कामोठे परिसरात कारवाई**

कामोठे येथील सेक्टर २१ आणि २२ मध्ये अनधिकृत भाजी विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान टेम्पो जप्त करण्यात आले. तसेच, खांदा कॉलनी परिसरातही अतिक्रमणविरोधी मोहीम राबविण्यात आली.

**पनवेलमध्ये हातगाड्या तोडल्या; बाजार रोखण्यासाठी पथक तैनात**

पनवेल येथील मार्केट यार्ड परिसरात अनधिकृतपणे रस्त्यावर लावण्यात आलेल्या हातगाड्यांवर तोडक कारवाई करण्यात आली व सर्व सामान जप्त करण्यात आले. नवीन पनवेल येथील डी-मार्ट समोरील परिसरात अनधिकृत बाजार भरू नये, यासाठी अतिक्रमणविरोधी पथकातील कर्मचारी आणि सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले आहेत. या माध्यमातून परिसरात अनधिकृतपणे बाजार भरविण्यास प्रतिबंध करण्यासाठी दक्षता घेतली जात आहे.

**कळंबोलीत विविध ठिकाणी अतिक्रमणांवर कारवाई**

कळंबोली परिसरातही अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली. पोलीस मुख्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांवर अतिक्रमण पथकाने तोडक कारवाई केली, तसेच गणपती तलावाजवळील नर्सरीवरही कारवाई करण्यात आली. रोडपाली बस डेपो परिसरात कारवाई करून भाजीपाला जप्त करण्यात आला.

सेक्टर २० मध्ये दुकाने हॉटेल्स बाहेरील अनधिकृत शेडवर जेसीबीच्या साह्याने मोठी तोडक कारवाई करण्यात आली. यावेळी उपायुक्त रविकिरण घोडके उपस्थित होते.

**खारघर मधील अनधिकृत नर्सरीवर तोडकर कारवाई**

खारघर मधील अनधिकृत नर्सरीवर तसेच फुटपाथवरील अनधिकृत कृत व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली.

**आसूडगाव परिसरातील पदपथावरील अतिक्रमणे हटविली**

अतिक्रमण विभागाच्या पथकाच्या मार्फत आसूडगाव पेट्रोल पंपाजवळील पदपथावर करण्यात आलेली अतिक्रमणे तसेच अनधिकृत नर्सरी हटविण्यात आली.

कामोठे, खारघर, पनवेल आणि कळंबोली परिसरातील रस्ते व पदपथांवरील अतिक्रमणे हटविण्यावर महापालिका भर देत असून, यापुढे अतिक्रमण कारवाई अधिक कडक करण्यात येणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे यांनी दिली आहे.




## एकविरा आई



एकविरा आई तू डोंगरावरी नजर हाय तुझी कोल्यांवरी.. 'हे गाणं ऐकताच डोळ्यांसमोर उभे राहतात ते आगरी-कोळी बांधव.. याचं आगरी-कोळ्यांची देवी म्हणजे कार्त्यात वसलेली एकविरा देवी.. मुंबईपासून १०० किलोमीटर अंतरावर असलेल्या लोणावळा येथील आई एकविरा देवी मंदिराला नवरात्रीत नक्कीच भेट द्यायला हवी. हे मंदिर महाभारत काळातील आहे. असे म्हटले जाते की, पांडवांनी त्यांच्या वनवासात फक्त एका रात्रीत हे मंदिर बांधले होते. चला तर मग जाणून घेऊयात या मंदिराची खास वैशिष्ट्ये.

**आगरी-कोळ्यांचे देवस्थान..**

लोणावळा हे नैसर्गिकरित्या अतिशय सुंदर ठिकाण आहे. येथे कार्ला लेणी आहेत, जिथे आगरी-कोळ्यांचे देवस्थान असलेली एकविरा देवीचे मंदिर आहे. या मंदिराची खासियत म्हणजे ज्या गुहांच्या शेजारी एकविरा देवीची पूजा केली जाते, त्या गुहा एकेकाळी बौद्ध धर्माचे केंद्र मानल्या जात होत्या.

**पांडवांनी एका रात्रीत बांधले देवीचे मंदिर..!!**

महाभारताच्या कथेनुसार, पांडव वनवासात पोहचताच सर्व पांडव बंधू आपल्यावर झालेल्या घोर अन्यायाबद्दल बोलू लागले. त्यांचे हे शब्द ऐकून डोंगरात विराजमान असलेल्या एकविरा देवीचे मन हेलावले आणि तिने त्यांना संकटातून बाहेर पडण्यास मदत केली. देवी म्हणाली, हे पांडवपुत्रांनो, मी तुमचे भाग्य बदलू शकत नाही कारण तुमचा जन्म एका महान कार्यासाठी झाला आहे. पण, मी तुम्हाला या दिवसांतून बाहेर पडण्यासाठी नक्कीच मदत करू शकते.

देवीचे हे शब्द ऐकताच पांडव देवीपुढे नतमस्तक झाले. त्यानंतर देवीने पांडवांची परीक्षा घेतली आणि म्हटले की जर वनवास सोपा करायचा असेल तर तुम्हाला देवीचे मंदिर बांधावे लागेल, पण या मंदिराचे बांधकाम एका रात्रीत पूर्ण करावे लागेल. एकविरा आईचे आव्हान स्वीकारून पांडवांनी रात्रभर जागे राहून डोंगराच्या मधोमध हे मंदिर बांधले आहे. मंदिर बांधताच पांडवांनी देवीला हात जोडून तिला मंदिरात येण्यास सांगितले. पांडवांची हाक ऐकून एकविरा देवीने पुन्हा दर्शन दिले आणि अज्ञातवासात त्यांना कोणीही ओळखणार नाही, असे वरदान दिले.

**एकविरा देवी ही जलदेवता म्हणुन प्रसिध्द आहे.**

जलदेवता म्हणजे ज्या लोकांचा पाण्याशी जास्त संबध येतो. कोळी, आगरी या लोकांचा व्यावसाय हा पूर्णपणे पाण्याशी संबधीत आहे. त्यामूळेच या समाजाने आई एकविरेला कुलदैवत मानलं आहे. आई एकवीरा क्षत्रीय, वैश्य, शुद्र समाजाची कुलदैवता असल्या कारणाने ती अति प्राचीन देवता असावी असा इतिहास संशोधकांचे मत आहे.आई एकविरा मातेची कहाणी स्कंदपुराण, महाभारत, गणेश पुराण, काली पुराण यांमधुन सांगितली गेली आहे. प्रत्येक ठिकाणी आपल्याला वेगवेगळे संदर्भमिळतात. आणि म्हणूनच इतिहासकारांसाठी हे मंदिर एक गुढ मानले जाते. पण देवीच्या भाविकांसाठी मात्र ती संकटात तारुन येणारी, नवसाला पावणारी एकविरा आई आहे.

**– शिवाजी चौगुले**

# दादांनो आता तरी झाडे लावा हो...

हल्ली मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळाचे सावट पसरले आहे. बरोबर जून महिन्यात मृग नक्षत्राला प्रारंभ झाला आणि हवामान खात्याने पावसाचा अंदाज चांगला वर्तवला की लगेच सर्व शेतकरी बांधव हवामान खात्याच्या भरवशावर थोडाफार पाऊस पडला की लागलीच पेरणी करून म ोकळे होतात. परंतु हल्ली हवामान खात्याचे अंदाज फ ेल ठरत आहेत. हे आपल्याला माहीतच आहे. कधी कधी हवामान खात्याचा अंदाज खरा ठरतो. हे सुद्धा आपल्याला नाकारता येणार नाही. परंतु ज्या भागात वृक्षांची संख्या अधिक आहे, त्याच भागात पाऊस मुसळधार पडत आहे. आणि जिकडे झाडांची संख्या कमी आहे तिकडे मात्र पाऊसही कमी बरसत आहे. मागील दहा वर्षांपासून महाराष्ट्रात पाऊस म्हणावा तसा पडत नाही. शेतकऱ्यांच्या वाट्याला एकतर कोरडा दुष्काळ आहे नाहीतर ओला दुष्काळ आहे. पाऊस पडला की कितीही पडत आहे. आणि एकदा थांबला की पूर्ण पाऊस काळ होईपर्यंत बरसायचे नाव घेत नाही. मग काय? शेवटी शेतकऱ्यांच्या वाट्याला कोरडा दुष्काळ येणे सहाजिक आहे. पाऊस पडत नाही म्हणून शेतकरी पावसाला दोष देत आहेत. पण पाऊस कशामुळे पडत नाही, याचा विचार का बरे करत नाहीत? पाऊस न पडण्याला जबाबदार कोण आहे? तर आपण सर्वजण आहोत. कारण आपण वृक्ष लागवड करण्याऐवजी वृक्षतोड करून निसर्गाला भकास करून टाकले आहे. मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करायची आणि त्या जागी मोठ मोठ्या बिल्डिंग, उद्योग धंदे आणि कारखाने उभे करायचे. त्यात आपलीही काही चुकी नाही. कारण लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे, लोकसंख्या वाढत असल्यामुळे लोकांना राहण्यासाठी जागा कमी पडत आहे. जागा व्हावी म्हणून वृक्षतोड आपण करत आहोत. पण याचा परिणाम थेट ऋतुचक्रावर होत आहे. म्हणून लोकसंख्या विकासात वाढ थांबवणे ही देखील काळाची गरज आहे. हम दो, हमारे दो ही पद्धत अस्तित्वात आणावी लागेल. तरच लोकसंख्या कमी होईल आणि वृक्षतोड कमी होईल. नाहीतर लोकसंख्या वाढत गेली आणि लोकांना राहण्यासाठी जागा कमी पडू लागली की लोक आपोआप वृक्षतोड करून त्या ठिकाणी घरे बांधतात आणि आपण सगळ्यांनी मिळून मोकळ्या जागेत, रस्त्याच्या कडेने, घराच्या समोर, शेतातील बांधावर वृक्ष लागवड करून पर्यावरणाला आणि निसर्गाला अबाधित ठेवणे काळाची गरज आहे. आपण जेवढे झाडे लावाल तेवढा अधिक पाऊस पडण्याची शक्यता असते. आपण पाहतोय की हल्ली ज्या भागात वृक्षांची संख्या कमी आहे त्या भागात पाऊस पडत नाही आणि ज्या भागात वृक्ष मोठ्या प्रमाणात आहेत तिथे मात्र पाऊस थांबायचे नाव घेत नाही. हल्ली मराठवाड्यावर कोरडा दुष्काळ पडण्याचे कारण म्हणजे वृक्षतोड आणि जल प्रदूषण कारणीभूत आहे.

यावर्षीचा दुष्काळ १९७२ च्या दुष्काळापेक्षा भयानक दुष्काळ म्हणून जाहीर केला आहे. मृग नक्षत्राला आरंभ होताच थोडाफार पाऊस पडला की शेतकरी शेतात पेरणी करतात. शेती देखील यावर्षी चांगली पिकणार होती परंतु निसर्गाच्या दुष्टचक्रात शेती अडकली. लोकांना देखील वाटू लागले की, आता यावर्षी चांगली सुगी होणार. परंतु शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आणि अचानक पावसाने बरसने थांबवले. आणि शेतकरी नैराश्याच्या कचाट्यात अडकले. पूर्ण पावसाळा संपून आता हिवाळ्याला आगमन होत आहे. तरी अजून देखील पाऊस पडायचा पत्ता नाही. विशेष



करून शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील शेतकरी दुष्काळाच्या झळा सोसत आहेत. शेतातील विहिरीला पाणी नाही. विहिरी, तलाव, नद्या आणि खदानी देखील कोरड्या पडायच्या मार्गावर आहेत. हातपंपाला आणि बोरला देखील पाणी आता कमी प्रमाणात येत आहे. दुष्काळामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले आहे. तळे विहिरी आणि नद्या कोरड्याठाक पडल्यामुळे पशु प्राण्यांचे जीवन धोक्यात आले आहे. लोकांना पाण्याच्या शोधात वनवन भटकावे लागणार आहे. जनावरांना चाऱ्याची नितांत गरज भासणार आहे. पाण्याअभावी व चाऱ्या अभावी माणसांचे आणि इतर प्राण्यांचे हाल हाल होणार आहेत. आता लोकांचा कल पुणे व मुंबई या ठिकाणी कामासाठी लोकांची गर्दी पडणार आहे. यावर्षी पाऊस पडला नाही आता पुढल्या वर्षी देखील पडेल का नाही? याचा भरवसा काय? कारण सांगायचा मूळ मुद्दा म्हणजे याला कारणीभूत आपणच आहोत परंतु आपण निसर्गाला दोष देत आहोत. यावर्षी शेतकऱ्यांची दिवाळी देखील गोड होणार नाही. कोणतेच सण-उत्सव थाटात साजरे केले जाणार नाहीत. दुष्काळाच्या झळा आणि नापिकीला कंटाळून शेतकरी आत्महत्या करत आहेत. शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. सावकाराचे कर्ज, घर संसार, मुला मुलींचे शिक्षण आणि इतर लागणारा खर्चा यामुळे शेतकरी कोलमडून गेला आहे. आतून पूर्णपणे खचून गेला आहे. भविष्याचा विचार करून शेतकरी निराश होत आहे आणि आत्महत्या करत आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी निसर्गाला व हवामान खात्याला दोष देत बसण्यापेक्षा आपल्या सतःला दोषी ठरवून मोठ्या प्रमाणात होणारी वृक्षतोड थांबवावी आणि मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करावी. त्यासाठी शेतकऱ्यांनी आता तरी जागृत होण्याची गरज आहे. वृक्षतोड करणाऱ्यांवर शासनाने कठोर कारवाई करावी. प्रत्येकाने दोन ते तीन झाडे दत्तक घेऊन त्या झाडांचे मोठ्या वृक्षात रूपांतर होईपर्यंत चांगले संगोपन करावे आणि भकास, उजाड व विद्रूप झालेला निसर्ग पुन्हा एकदा हिरव्या शालूने नेसवावा. नाहीतर आपण निसर्गासोबत पंगा घेत असाल तर तो आपल्याला जिव्हारी लागणार आहे. निसर्गासोबत नाद करणे बरा नाही. आपण असेच वृक्षतोड करीत राहिलो आणि वृक्ष लावण्याचा उपक्रम हाती जर घेतला नसेल तर समजा एक दिवस आपल्याला उष्णतेच्या झळांनी भाजून निघावे लागेल. प्रशासनाने देखील याची गांभीर्याने दखल घेणे हल्ली गरजेचे आहे. शेतकरी जगाचा पोशिंदा आहे तो जगला तरच शेती पिकेल आणि देश जगेल. नाहीतर जगाला एक दिवस तडफडून मरावे लागणार आहे, एवढे मात्र निश्चित. म्हणून दादांनो जागृत होऊन आता तरी झाडे लावा हो...

**– बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# नवसाला पावणारी चिंचपाड्याची नवदुर्गा...

दुर्गा माता ही हिंदू धर्मातील एक शक्तिशाली देवी आहे, जिला आदिशक्ती मानले जाते आणि ती 'अजिक्य' या अर्थाने ओळखली जाते. तिने दुर्गम राक्षस व इतर अनेक राक्षसांचा वध करून वाईटावर बांगत्याचा विजय मिळवता. ती पार्वती, चंडी, काली अशा अनेक रूपांमध्ये ओळखती जाते आणि नवरात्रात तिची विशेष पूजा केली जाते... अशीच काहीशी कल्याण पूर्वे तील चिंचपाड्याची नवदुर्गा म्हणून साईकृपा मित्र मंडळ गेली १९ वर्षे नवरा नवरात्रोत्सव परंपरा मोठ्या उत्साहात जपत आहे. ही संस्कृती जपताना सम राज आणि राष्ट्राता उपयुक्त ठरतील, असे अनेक बदल स्वीकारून मंडळाने एक वेगळा आदर्श देवी भक्तांना दिला आहे. सुवर्ण महोत्सवाकडे वाटचाल करणाऱ्या या मंडळाने आतापर्यंत अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवले आहेत. तसेच विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार लहान मुलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम चित्रकला स्पर्धा व म ान्यवरांची गाठी भेटी आयोजित करण्यात आली आहेत. समाज प्रबोधन करण्याचा वसा मंडळीने घेतला आहे.

कल्याण (पूर्व) चिंचपाडा विभागातील उत्कृष्ट मंडळ म्हणून साई कृपा मित्र मंडळ उदयास येत आहे मराठी भक्ती संगीत सांप्रदायिक भजन कार्यक्रम ठेवण्यात येतो मंडळाचे संस्थापक श्री. राजेश सौर्य सांगतात मंडळाचे वैशिष्ट्य म्हणजे मंडळाचा प्रत्येक सदस्यच हा अध्यक्ष..!! मूर्तींचे देखणे रूप हेच मंडळाचे खासियत.. चिंचपाडा आजूबाजूच्या भागातील नागरिक आपले नवस बोलण्यासाठी देवीकडे साकडं घालण्यासाठी येत असतात देवी घटस्थापनेपासून ते विसर्जनापर्यंत सकाळ संध्याकाळ दैनंदिन देवीची ८ वाजता महाआरती होते. मंडळांनी मंगळवार दिनांक २० ऑक्टोंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ ते ११वाजेपर्येंत भंडारा महाप्रसाद आयोजित केला आहे तसेच देवी २१ ऑक्टोंबर रोजी सायं. विसर्जन सोहळा आयोजित केला असून विसर्जनाच्या दिवशी मंडळ लाईट डॉल्बी




चा वापर न करता पारंपारिक वाद्याच्या तालावर देवींची विसर्जनाची सांगता करतात...!! या कार्यक्रमासाठी राजेश सौरे अध्यक्ष संस्थापक संस्थापक, गौतम तिवारी, किशन सिंह (बालाजी ज्वेलर्स), तेजश भुगे, रामजी देवाशी सुभाष भोईर, हरीश म्हात्रे, संतोष शेलार(फोटोग्राफर), योगेश पाटील, मनोहर चौधरी, श्री. आनंद तिवारी, शिवाजी चौगुले, गणेश सौरे, सुधीर पांडे, हरिश्चंद्र म्हात्रे, मदन धनगर (स्वीट मार्ट) आणि संजीव सौर्य हे कार्यकर्ते मेहनत घेतात. अशी ही कल्याण पूर्वेची नवसाला पावणारी चिंचपाडाची नवदुर्गा...!! आई पर्यावरण संरक्षणासाठी सर्वांना जाणीवा दे... 'कष्टाने मिळते तेच टिकते' हा पाठ सर्वांच्या ध्यानी असू दे' पृथ्वी मातेचा संहार टाळण्यासाठी, निसर्गचक्र अबाधित राखण्यासाठी सर्व मानवांना पर्यावरणाचे, सर्व प्रकारचे प्रदूषण टाळण्याची बुद्धि दे. प्लास्टिकच्या अतिवापरावर निर्बंध आणण्याचे शहाणपण दे. आई तू सकल विश्वाची निर्माती आहेस. फक्त तुझ्या भक्तांना योग्य मार्गावर आण, तंत्रज्ञानाच्या जगात माणूस जसाजवळ येऊ दे.. सर्वांना आरोग्य चांगले दे. जय आई माता तुझ्याकडे फक्त इतकेच मागणं...!!

**– शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**चिंचपाडा-कल्याण(पूर्व)**
**९८६७७३२५०४**

## कालरात्री

वामपादोल्लसल्लोह
लता कण्टक भूषणा
गळा कंकालमालिनी
कालरात्रीचेविभूषणा

महाकाली भॅयमरी
वर्धै मूर्धध्वजा कृष्णा
स्वरूप साठवेअक्षात
सरते भक्ताची तृष्णा

रंग तव काळाकभिन्न
लंबिष्ठा कर्णिकाकर्णा
नग्ना खरास्थिता देवी
तू तैलाभक्त शरीरिणा

ज्वाळायेती मुखातूनि
जाग्तावस्थाकणकणा
उग्रअक्ष वेधतात लक्ष
उर्जाउसळे क्षणाक्षणा

विचीत्रवाहन रे गर्दभ
युध्दातिष्ठत रणांगणा
धारिले विचीत्र रुपडे
बाह्य स्वरणीम वर्णा

शब्द थिटे तव वर्णना
पडलो मा संपूर्ण उणा
ना फिटे उपकार कृत
आयुष्यबध्द तवऋणा

**✍ - हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# मजबूरी का नाम गांधीजी ही क्यू?

आपण सर्वजण नेहमी बोलताना एक लोकप्रिय म्हण वापरतो. ती म्हणजे, 'मजबूरी का नाम गांधीजी!' राष्ट्रपित्याला मजबूर समजणारा हा देश पुढे जाऊ शकेल का? राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना मजबूर समजणे ही एक चुकीची धारणा आहे.

गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत वसाहतवाद्यांविरुद्ध आपला संघर्ष आरंभला आणि आपल्या सार्वजनिक कार्याला सुरुवात केली. वर्णद्वेष आणि अन्यायकारक कायद्यांविरुद्ध त्यांनी संघर्ष केला. भारतीय समुदायाच्या हक्कांसाठी त्यांनी सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारला आणि अन्यायाविरुद्ध संघटितपणे लढण्याची प्रेरणा दिली. आपला जीव अनेक वेळा तेथे त्यांनी धोक्यात घातला. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातदेखील महात्मा गांधींनी आपल्या विचारांना कधीही मुरड घातली नाही. अहिंसा, सत्याग्रह आणि उपोषण या तत्त्वांचा त्यांनी शस्त्र म्हणून उपयोग केला. जीवनात त्यांनी मजबुरीने कधीही वागल्याचे दिसून येत नाही. त्यांची राहणी साधी होती. त्यांचे बोलणे मवाळ होते. त्यांच्या हातात कोणतेही शस्त्र नव्हते. ते निरुपद्रवी जीवन जगले. त्यांनी नेहमी सामंजस्याची भूमिका घेतली. बंधुभाव वाढवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांचा मार्ग खडतर होता; परंतु त्या मार्गावरून ते कधीही विचलित झाले नाहीत.माणसं मजबूर केव्हा होतात? कर्जबाजारी झालेली, मनाने खचलेली, स्वकर्तृत्व गाजवण्यात कमी पडलेली, दुःखाने पीडित, जराजर्जर आजाराने ग्रस्त, भित्र्या स्वभावाची आणि प्रापंचिक अडचणींनी त्रस्त असलेली माणसं सामान्यतः मजबूर होऊन जगतात. अशा मजबूर माणसांचा क्रूर आणि कावेबाज लोक सर्रास आपल्या स्वहितासाठी उपयोग करून घेतात.

मजबूर होणे म्हणजे स्वतःचे स्वातंत्र्य गमावून पारतंत्र्यात जाणे. मजबूर होणे म्हणजे कात्रीत सापडणे. मजबूर होणे म्हणजे दुसऱ्यापुढे नतमस्तक होणे. मजबूर होणे म्हणजे नाक दाबून घेऊन बुक्क्यांचा मार सहन करणे. मजबूर होणे म्हणजे स्वतःचा सन्मान गमावून बसणे. गरिबी आणि मजबुरी या हातात हात घालून पुढे जातात, असे आपल्याला वाटू शकते. परंतु प्रत्येक गरीब माणूस मजबूर असतोच असे नाही. खेडेगावात एक म्हण आहे, 'माणसानं नकटं असावं; परंतु धाकटं असू नये.' थोडक्यात, माणसाने कोणापुढेही मजबूर होऊ नये. कुणापुढे हात पसरू नयेत. स्वाभिमानाने जगावे.

थोडक्यात, जगात वावरताना स्वतःचे मत, स्वतःचे विचार आणि स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवणे गरजेचे आहे. कोणत्याही अन्यायाला, जुलूमाला किंवा परिस्थितीला घाबरून स्वतःला लहान किंवा कमकुवत समजू नये. मजबूर होऊ नये किंवा स्वतःला मजबूर समजू नये.कोणी कितीही मोठा असो, कितीही धनवान असो किंवा सत्ताधीश असो, या सर्वांपुढे गरज नसताना गुडघे टेकवून मजबूर होता कामा नये. तसे पाहिले तर प्रत्येक जण कधी ना कधी, कुठे ना कुठे मजबूर झालेला असतो. आपले इच्छित ध्येय साध्य करण्यासाठी अनेक वेळा मजबूर होऊन वाट पाहावी लागते.पुरुषसत्ताक व्यवस्थेत पूर्वी महिलांना मजबूर होऊन आपल्या इच्छा, आकांक्षा आणि स्वातंत्र्य यांना मुरड घालून पुरुषांपुढे मजबुरीने जीवन जगावे लागले. अस्पृश्यांना आपल्या जीवनात कोणत्याही हौसमौजा न करता मजबुरीने जीवन जगावे लागले. अमेरिकेसारख्या देशांमध्ये पूर्वी गुलामांना आपल्या मालकांकडे मजबुरीने राहावे लागले होते. शेवटी, प्रत्येक जण आपल्या जीवनातील मजबुरी झुगारून देऊन स्वाभिमानाने जगण्यासाठी धडपडत असतो. पण 'मजबूरी का नाम गांधीजी' असे म्हणणे मात्र चुकीचे आहे; कारण अहिंसा म्हणजे कमजोरी नसून नैतिक धैर्य आहे.

**– किशोर जाधव, सोलापूर**
**– मो. नं. ९९२२८८२५४१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### महाबळेश्वरातील रस्त्यावरील खड्डे बुजविण्याची शिवसेनेची मागणी



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१६, महाबळेश्वर (सातारा) :** शहरातील ग्रेस कॉटेज परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गेटपासून शेठ गंगाधर माखरिया गार्डनपर्यंतच्या सिमेंट रस्त्यावर गेल्या अनेक महिन्यांपासून ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांची तातडीने दुरुस्ती करून सिमेंटने बुजविण्यात यावेत, अशी मागणी शहर शिवसेनेच्या वतीने करण्यात आली.

यासंदर्भात शहर शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी मेढा येथील जावळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता निखिल पवार यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. निवेदनाची दखल घेत पवार यांनी संबंधित विभागाला तातडीने निर्देश देत खड्डे बुजविण्याचे काम लवकरात लवकर करण्यास सांगितले. यावेळी शहरप्रमुख राजाभाऊ गुजर, उपशहरप्रमुख राजेश साळवी, शहानवाज भाई खारकंडे, समीर तांबोळी, निलेश केळगणे आदी उपस्थित होते.

### भुजबळांना अहिल्यानगर समता परिषदेतर्फे वाढदिवस शुभेच्छा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, अहिल्यानगर :** राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांसमोरील अडचणी लक्षात घेऊन राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री तथा समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष छगन भुजबळ व समता परिषदेचे कार्याध्यक्ष माजी खासदार समीर भुजबळ यांचा वाढदिवस विविध समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्यात आला. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर समता परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी दिनांक १५ ऑक्टोबर भुजबळ फार्म येथे भुजबळ यांची भेट घेऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी त्यांनी दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य, तसेच गरजूंसाठी वैद्यकीय किट आणि अन्य उपयुक्त वस्तू भेट दिल्या. वाढदिवसानिमित्त हार, पुष्पगुच्छ आणि शालींवर अनावश्यक खर्च करण्याऐवजी गरजू दुष्काळग्रस्तांना मदतीचा हात देणे,हा या उपक्रमागील उद्देश आहे. सामाजिक बांधिलकी जपत गरजू घटकांच्या मदतीसाठी पुढाकार घेण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी भुजबळ ब्रिगेड आणि अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने दोन कार्डियाक आणि सात ऑक्सिजन सुविधायुक्त अशा नऊ रुग्णवाहिकांचे लोकार्पण करण्यात आले. तसेच दुष्काळग्रस्त भागासाठी १५० पाण्याच्या टाक्या, येवला तालुक्यातील विद्यार्थिनींना २५ सायकलींचे वाटप आणि रक्तदान शिबिराच्या माध्यमातून १७० रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले.

मंत्री भुजबळ यांना शुभेच्छा देण्यासाठी समता परिषदेचे प्रदेश चिटणीस अंबादास गारुडकर, जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे, महिला जिल्हाध्यक्ष संगीता ढवळे,समता परिषदेचे नेते रामदास फुले, नगर तालुकाध्यक्ष सोमनाथ धाडगे, जिल्हा कार्यकारिणी सदस्य पत्रकार वसंत रांधवण, सदस्य अनिल गाडीलकर,अहिल्यानगर महानगराध्यक्ष ब्रिजेश ताठे, कार्याध्यक्ष अभिषेक चिपाडे, यांच्यासह पारनेर आणि जामखेड तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

### पळसपूर येथे नवरात्रोत्सवाचे रौप्य महोत्सवी वर्ष



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील पळसपुर येथील भगवतीदेवी सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळाच्या वतीने रौप्य महोत्सवी २५ व्या वर्षानिमित्त विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून पंचक्रोशीत उत्साहाचे वातावरण आहे.

सोमवार,दि. १२ ऑक्टोबर २०२६, रात्री ९.३० वा. जय भवानी उद्योग समूहाचे संजय धनवान आहेर यांच्यावतीने खेळ पैठणीचा प्रथम बक्षीस मानाची पैठणी / ३२ इंच एलईडी टिव्ही द्वितीय बक्षीस : ९ ु ९ मिक्सर, तृतीय बक्षीस : लेडीज घड्याळ

दररोज दांडिया खेळणाऱ्या महिला भगिनींमधून ३ चिठ्ठ्या काढण्यात येतील. अशा एकूण २७ चिठ्ठ्यांमधून ३ भाग्यवान विजेत्यांची निवड केली जाईल.

प्रथम क्रमांकासाठी धनंजय शेठ निमसे यांच्या वतीने वॉटर प्युरिफायर

द्वितीय : डिनर सेट ३३ पिस – सौजन्य संतोषशेठ चौगुले

तृतीय : होम थिएटर – सौजन्य भाऊसाहेब रेपाळे (आप्पा)

रविवार दि. १८ ऑक्टोबर २०२६, रात्री ९.३० वा.भव्य संगीत खुर्ची स्पर्धा संजय आहेर यांच्या वतीने प्रथम क्रमांकासाठी छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती

द्वितीय क्रमांकासाठी पंकज आहेर यांच्यावतीने : रोख रु. १५०१/

तृतीय क्रमांकासाठी अभय बाळासाहेब आहेर यांच्यावतीने १००१ रोख बक्षीस देण्यात येणार आहे.

तरी या सर्व कार्यक्रमांचा महिला भगिनींनी व भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन भगवतीदेवी सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळ, पळसपूर व समस्त ग्रामस्थ मंडळाने केले आहे.

# शिक्षक संघटनेचा शिक्षण परिषदेवर बहिष्कार !

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** शासन निर्णयानुसार महिन्यातील एक दिवस सकाळ पाळीत शाळा घेऊन शिक्षण परिषद घेण्यात येत होती. मात्र, संदर्भीय पत्रानुसार सदर शिक्षण परिषदा ह्या शनिवार (अर्धा दिवस शाळेला सुट्टी असल्याने) त्या दिवशी घेण्यात यावे असे आदेशित केले आहे. माहे ऑक्टोबरची शिक्षण परिषद दि. १७ ऑक्टोबर शनिवारला घेण्यात येणार आहे. त्यामुळे शनिवार दिवशीच्या शिक्षण परिषद वर संघटनात्मक बहिष्कार करण्यात येणार आहे.

शनिवार दिवस ही प्राथमिक शिक्षक यांचा अर्धा दिवस सुट्टीचा वार असून, या दिवशी बरेच शिक्षक आपले खाजगी कामात व्यस्त असतात. तसेच शनिवार हा दिवस शाळांमध्ये पायाभूत साक्षरता , एफएलएन उपक्रम, शालेय पोषण आहार हिशोब, बाल चित्रपट दाखवणे, कार्यालयीन कामकाज सर्व शालेय माहिती देणे व पुढील आठवड्याचे नियोजन यासाठी राखीव असतो. तसेच अनेक शिक्षकांना आपल्या मूळ गावी जाण्यासाठी मुख्यालयापासून ६०-८० किमी प्रवास करावा लागतो. कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त अतिरिक्त वेळेत परिषद झाल्यास महिला शिक्षक व दूरच्या शिक्षकांना अडचण होते आणि म ानसिक ताण येतो.

महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक समिती जिल्हा चंद्रपूर, अखिल चंद्रपूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य जुनी पेंशन संघटना चंद्रपूर, कास्ट्राईब शिक्षक संघटना चंद्रपूर, प्रहार शिक्षक संघटना चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ चंद्रपूर, म.रा. कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ चंद्रपूर, म. रा. शिक्षक भारती संघटना (प्राथ.) स्वतंत्र समता शिक्षक संघ चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक परिषद चंद्रपूर, राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी कर्मचारी- अधिकारी महासंघ, चंद्रपूर, शिक्षक सहकारी संघटना जिल्हा चंद्रपूर, पदवीधर प्राथमिक शिक्षक महासंघ चंद्रपूर इत्यादी संघटनांनी बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. चानकुमार खोब्रागडे जिल्हाध्यक्ष प्रहार शिक्षक संघटना चंद्रपूर, कालिदास येरगुडे जिल्हाध्यक्ष म. रा. प्राथ. शिक्षक समिती चंद्रपूर, विपीन धाबेकर जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र राज्य जुनी पेंशन संघटना चंद्रपूर, राजू लांजेकर जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक परिषद चंद्रपूर, अशोक राऊत जिल्हाध्यक्ष कास्ट्राईब शिक्षक संघटना चंद्रपूर, किशोर आनंदवार जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र राज्य पुरोगामी शिक्षक समिती चंद्रपूर, सत्श बावणे जिल्हाध्यक्ष अखिल भारतीय महा. राज्य प्राथ. शिक्षक संघ, चंद्रपूर, अरुण खराते जिल्हाध्यक्ष कास्ट्राईब कर्म. कल्याण महासंघ चंद्रपूर, बंडू राठोड जिल्हाध्यक्ष म. रा. प्राथमिक शिक्षक संघ चंद्रपूर, अविनाश जुमडे जिल्हाधियक्ष शिक्षक सहकार संघटना चंद्रपूर, प्रकाश कुमरे जिल्हाध्यक्ष पदवीधर प्राथ. शिक्षक संघ चंद्रपूर, प्रमोद कोरडे जिल्हाध्यक्ष म. रा. केंद्र प्रमुख संघ चंद्रपूर, प्रदिप पावडे जिल्हाध्यक्ष ओबीसी कर्मचारी- अधिकारी महासंघ चंद्रपूर, विजय कुमरे जिल्हाध्यक्ष आफ्रोड संघटना चंद्रपूर, अमेल देठे जिल्हाध्यक्ष म. रा. शिक्षक परिषद चंद्रपूर, सुरेश वासेकर जिल्हाध्यक्ष अपग्रेड मुख्याध्यापक महासंघ चंद्रपूर, नंदकिशोर शेरकी जिल्हाध्यक्ष शिक्षक भारती संघटना चंद्रपूर स्वतंत्र समता.

शनिवारलाच शिक्षण परिषदा घेणे हा वरिष्ठांचा अन्यायकारक आदेश असून महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटना जिल्हा चंद्रपूर तर्फे होऊ घातलेल्या प्रत्येक महिन्यातील शनिवार दिवशीच्या शिक्षण परिषद वर संघटनात्मक बहिष्कार करण्यात येत आहे.

## पारनेर तालुक्यात विकासकामांचा धडाका! रस्ते, पुलांसाठी कोट्यवधींचा निधी

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१७, सुपा (अहील्यानगर) :** पारनेर तालुक्यातील रस्ते आणि पुलांच्या विकासकामांना गती मिळत असून, विविध मार्गांच्या सुधारणेसाठी कोट्यवधी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. CRIF अंतर्गत मंजूर व प्रस्तावित विकासकामांमुळे तालुक्यातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होण्याची अपेक्षा आहे. या कामांमुळे ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी आणि वाहनचालकांना मोठा दिलासा मिळणार आहे,

**रस्ते व पुलांच्या कामांसाठी कोट्यवधींचा निधी**

टाकळी ढोकेश्वर–कान्हूर पठार या राज्य महामार्ग क्रमांक ६७ वरील पुलाच्या कामासाठी १ कोटी ५० लाख रुपयांचा निधी नमूद करण्यात आला आहे. तसेच पारनेर–जामगाव–वाळवणे या प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक १२ साठी २ कोटी ७५ लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे.

वाळवणे–गोरेगाव–किणी–कान्हूर पठार–वडगाव–दर्या–दरोडी–रांधा–अळकुटी–चिंभूत या प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक ५० च्या कामासाठी २ कोटी ७५ लाख रुपयांचा निधी नमूद करण्यात आला आहे. याशिवाय वाळवणे–रांजणगाव रस्त्यासाठी ३ कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित/मंजुरीच्या प्रक्रियेत असल्याची माहिती देण्यात आली आहे.

या रस्त्यांच्या कामांमुळे ग्रामीण भागातील वाहतूक सुलभ होण्यास, शेतीमालाची ने–आण करण्यास आणि नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित होण्यास मदत होणार आहे.

**मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी मानधन समर्पित....**

सार्वजनिक कामांसोबतच सामाजिक बांधिलकीचे उदाहरण म्हणून १ लाख ८० हजार रुपयांचे मानधन मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी समर्पित करण्यात आले. हे मानधन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या माध्यमातून सहाय्यता निधीसाठी देण्यात आल्याची माहिती आहे.



या सामाजिक उपक्रमाचे युवक, नागरिक आणि शेतकरी वर्गातून स्वागत होत असून, लोकप्रतिनिधींनी विकासकामांसोबत सामाजिक जबाबदारीही जपावी, अशी भावना व्यक्त होत आहे.

**विकासकामांमुळे ग्रामीण भागाला दिलासा...**

पारनेर तालुक्यातील विविध गावांना जोडणारे रस्ते आणि पुलांची कामे पूर्ण झाल्यास दळणवळण अधिक गतिमान होईल. ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल आणि नागरिकांच्या दैनंदिन प्रवासातील अडचणी कमी होतील. त्यामुळे संबंधित विकासकामे वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण व्हावीत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी : बिडीओ धनंजय साळवे

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, विसापूर (चंद्रपूर) :** म हाराष्ट्र शासनाचा महत्वकांक्षी उपक्रम म्हणून' माझ गाव, आरोग्य संपन्न गाव' राबविण्यात येत आहे. ग्रामीण भागात आरोग्य सेवा सहज उपलब्ध व्हावी. नागरिकांच्या आरोग्यविषयक समस्यांचे वेळीच निदान व्हावे. प्रतिबंधात्मक उपाययोजना आरोग्य यंत्रणेच्या माध्यम ातून निर्माण केल्या जावी. निरोगी गावाचा संकल्प प्रत्यक्षात साकार करण्यासाठी नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी, असे प्रतिपादन बल्लारपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी धनंजय साळवे यांनी गुरूवारी कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी केले. बल्लारपूर पंचायत समिती व तालुका वैद्यकीय अधिकारी कार्यालयाच्या वतीने पंचायत समितीच्या राजे



खांडक्या बल्लाळशाह सभागृहात' माझ गाव, आरोग्य संपन्न गाव ' यावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. कार्यशाळेचे उदघाटन तहसीलदार रेणुका कोकाटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानी बिडीओ धनंजय साळवे, तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ.स्नेहल कासारे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. कुणाल म ोडक, वैद्यकीय अधिकारी डॉ.अश्विनी कांबळे, डॉ.ईशा पठाण, डॉ.शुभम देवगडे, डॉ.रुबिना शेख, डॉ.ज्योती गायकवाड, डॉ.सचिन नळे यांची उपस्थिती होती.

यावेळी डॉ. स्नेहल कासारे म्हणाल्या की, गावाचा सर्वांगीण विकास साधताना आरोग्य सेवा देखील महत्वाचा घटक आहे. यासाठी लोकसहभागाची भूमिका मोठी आहे. यातून कुटुंबाचे सामाजिक व आर्थिक जीवनमान उज्ज्वल होते. आपल्या आरोग्य यंत्रणेच्या माध्यमातून सुलभ आरोग्य सेवा द्यावी, असे त्यांनी म ार्गदर्शक म्हणून सांगितले.

कार्यशाळेचे प्रास्ताविक आरोग्य विस्तार अधिकारी साहेबराव पवार यांनी केले. संचालन आरोग्य विस्तार अधिकारी सतीश कौरासे यांनी केले, तर आभार स्वाती गोलपेलवार यांनी मानले. यावेळी विसापूर, कोठारी, कळमना व मानोरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य कर्मचारी, पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी, आशा स्वयंसेविका आदींची उपस्थिती होती.

## कळमसरे विद्यालयात वाचन प्रेरणा दिवस साजरा

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.१६, शिरपूर :** शिरपूर तालुक्यातील कळमसरे-येथील आदर्श माध्यमिक विद्यालयात आज गुरुवार दिनांक १५ ऑक्टोबर २०२६ रोजी आपल्या देशाचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.




याप्रसंगी डॉ.कलाम यांच्या प्रतिम ेचे पूजन विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षिका वैशाली गौरव सोनवणे व मुख्याध्यापक आर जे सोनवणे तसेच इतर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी सर्व विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील छोटी पुस्तक वाचण्यासाठी देऊन तीस मिनिटे वाचन घेण्यात आले.

तसेच विद्यालयातील शिक्षिका श्रीम ती हर्षदा चौधरी यांनी डॉक्टर कलाम यांच्या जीवनाचा परिचय करून देऊन आपण त्यांच्या जयंतीदिनी वाचन प्रेरणा दिवस का साजरा करतो याविषयीची पार्श्वभूमी समजावून सांगितली व विद्यार्थ्यांना आपल्या जीवनातील वाचनाचे महत्त्व समजावून सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षदा चौधरी यांनी तर आभार प्रदर्शन ज्योती नीकवाडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वसंत मोरे, ज्योती निकवाडे, हर्षदा चौधरी, नेहा चौधरी, रेणुका वाडीले, ललिता महाले, जायदा पिंजारी तसेच लिपिक मंगेश जांभळे व सेवक रमेश माळी व निलेश गिरासे इ.कर्मचारीवृंदाने सहकार्य केले.

# वडगाव सावताळ उपसा सिंचन योजना अंतर्गत तलावांचे सर्वेक्षण

## रोकडे यांच्या निवेदनानंतर जलसंपदा विभाग ॲक्शन मोडवर

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील वडगाव सावताळ येथील ६ तलावांमध्ये मुळा धरणातून उपसा सिंचन योजनेद्वारे यावे, अशी मागणी भाजपचे जिल्हा सरचिटणीस तथा वडगाव सावताळ सेवा सोसायटीचे चेअरमन शिवाजी रोकडे यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली होती. गेल्या अनेक महिन्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले असून जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या आशीर्वादाने व सकारात्मक निर्णयामुळे वडगाव सावताळ व गाजदिपुरच्या ६ तलावांसाठी मुळा धरण उपसा सिंचन योजना मंजूर करण्यात आली असून वडगाव सावताळ येथील ६ तलावांचे सर्व्हेक्षण करण्यात आले.

शिवाजी रोकडे यांनी मंत्री विखे पाटील यांची भेट घेऊन वडगाव सावताळ शिवारातील ब्रिटिशकालीन तलाव, लिंग ओहोळ, शिंदे मळा, खामकर झाप, पांढरी व गाजदिपुर अशा ६ तलावांमध्ये मुळा धरणातून उपसा सिंचनाने पाणी सोडण्याची मागणी केली होती. या तलावांमुळे गावचे ४०-५० टक्के क्षेत्र ओलिताखाली येते पण डिसेंबरनंतर पाणी संपल्याने शेतकऱ्यांचा पिण्याच्या व शेतीच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होतो, हे रोकडे यांनी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले होते.

मंत्री ना. विखे पाटील यांनी या मागणीला तत्काळ सकारात्मक प्रतिसाद देत जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना पाहणी व सर्वेक्षणाच्या सूचना दिल्या होत्या. त्यादृष्टीने काल सर्वे पूर्ण, लवकरच काम सुरू झाले आहे.

मंत्री महोदयांच्या आदेशानुसार जलसंपदा विभागाचे अए श्री.बोरुडे यांनी काल प्रत्यक्ष सर्वे पूर्ण केला. यावेळी चेअरमन शिवाजी रोकडे, मेहेर भाऊसाहेब, हनुमंत ठाणगे, तुकाराम रोकडे, उत्तम नरे, संदिप व्यवहारे, प्रविन ठाणगे, प्रतिक लोळगे आदि ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते.

या योजनेमुळे वडगाव सावताळ व गाजदिपुर परिसरातील सुमारे ५००० हेक्टर शेतीला कायमस्वरूपी सिंचनाचा आधार मिळणार असून शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. ग्रामस्थांच्या वतीने शिवाजी रोकडे व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार म ानले.



वडगाव सावताळ व गाजदिपूर परिसरातील तलावांमध्ये मुळा धरणातून उपसा सिंचन योजना मंजूर झाली असून जलसंपदा विभागाकडून सर्वे पूर्ण करण्यात आला आहे.

शेतकऱ्यांच्या हितासाठी हा प्रकल्प मंत्री विखे पाटील साहेबांच्या म ार्गदर्शनाखाली लवकरात लवकर पूर्णत्वास नेण्यासाठी शासन दरबारी सतत पाठपुरावा सुरू आहे.

**– शिवाजी रोकडे, चेअरमन**

# जावळी ग्रामपंचायतीलासामाजिक वनीकरणांकडून मिळालेली झाडे महिनाभरापासून रस्त्याच्या कडेलाच

## ग्रामसेवकाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह; झाडे लावा, झाडे जगवा'चा संदेश केवळ कागदावरच?

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१६, पेण (रायगड) :** 'झाडे लावा, झाडे जगवा', पर्यावरणाचे रक्षण करा आणि गाव हरित बनवा, या शासनाच्या आवाहनाला पेण तालुक्यातील जावळी ग्रामपंचायतने अक्षरशः फाट्यावर म ारले आहे. जावळी ग्रामपंचायत हद्दीत सामाजिक वनीकरण कडून वृक्षारोपण करिता मोफत दिलेली झाडे मागील म हिनाभरापासून रस्त्याच्या कडेला तशीच पडून आहेत. ऑक्टोबर हिट मुळे यातील अनेक झाडा सुकण्याच्या मार्गावर असून काही झाडांची पाने अक्षरक्षा सुकी पडले आहेत त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

ग्रामपंचायतीच्या या बेजबाबदार वर्तनामुळे शासनाच्या वृक्षारोपण मोहिम ेला ब्रेक लागला आहेयासंदर्भात सविस्तर वृत्त असे की सामाजिक वनीकरण कडून जावळी ग्रामपंचायतीला मोफत झाडे देण्यात आली होती. ग्रामपंचायत स्वतः ही झाडे घेऊन आले; मात्र संबंधित झाडांची अद्याप लागवड करण्यात आलेली नसल्याचे सांगण्यात येत आहे. झाडे आणून महिनाभर उलटूनही त्यांची लागवड का करण्यात आली नाही, असा सवाल उपस्थित होत आहे.



जावळी ग्रामपंचायतीतील झाडे लागवडीविना पडून असल्याची गंभीर बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर, या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल.

**– गटविकास अधिकारी गजानन लेंडी (पंचायत समिती, पेण)**

एकीकडे शासन पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनावर भर देत असताना, दुसरीकडे मोफत मिळालेली झाडेच लागवड विना पडून राहत असतील, तर अशा मोहिमांचा उद्देश साध्य होणार कसा, असा प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केला जाऊ शकतो.

झाडांची वेळेत लागवड न झाल्यास ती वाळण्याची किंवा खराब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेण्याची गरज आहे. ग्रामपंचायतीच्या विकासकामांमध्ये पर्यावरण संवर्धनाला ही महत्त्वाचे स्थान आहे. सामाजिक वनीकरण कडून झाडे स्वीकारल्यानंतर त्यांच्या लागवडीचे नियोजन करण्यात आले होते का, लागवडीसाठी जागा निश्चित केली होती का आणि झाडे महिनाभर रस्त्याच्या कडेला का पडून आहेत, याची चौकशी होणे आवश्यक आहे.

या चौकशीत कर्तव्यात कसूर किंवा निष्काळजीपणा आढळल्यास संबंधितांवर लागू नियमांनुसार प्रशासकीय अथवा शिस्तभंगाची कारवाई होणार का यांकडे सुद्धा नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### गटविकास अधिकाऱ्यांनी लक्ष घालण्याची गरज

पेण पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी जावळी ग्रामपंचायतीतील या प्रकरणाची प्रत्यक्ष पाहणी करावी. सामाजिक वनीकरण कडून किती झाडे आणि कोणत्या तारखेला उपलब्ध करून देण्यात आली, त्यांची सद्यस्थिती काय आहे आणि लागवड न करण्यामागील कारणे कोणती, याची चौकशी करावी. तसेच झाडांची लागवड तातडीने करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

'झाडे लावा, झाडे जगवा' हा संदेश केवळ घोषणांपुरता मर्यादित न राहता त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. वृक्षारोपण म्हणजे केवळ झाडे आणून ठेवणे नव्हे, तर त्यांची योग्य ठिकाणी लागवड करून त्यांचे संगोपन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे जावळी ग्रामपंचायतीतील या प्रकरणाची वरिष्ठ अधिकारी दखल घेऊन काय कार्यवाही करतात का?, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# श्री क्षेत्र लोणजाई माता गडावर दुर्गा सप्तशती पाठवाचन; अडीच हजार महिलांची उपस्थिती



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१५, विंचूर (नाशिक) :** सुभाषनगर येथील जागृत देवस्थान श्री क्षेत्र लोणजाई माता गडावर गुरुवारी ललिता पंचमीच्या शुभमुहूर्तावर श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, विंचुर यांनी तालुकास्तरीय श्री दुर्गा सप्तशती सामुदायिक पाठवाचन सोहळा अत्यंत भक्तिमय आणि उत्साही वातावरणात पार पडला. या धार्मिक सोहळ्यात निफाड तालुक्यातील सुमारे अडीच हजार महिलांनी एकत्र येत सामूहिक पाठवाचन केले. महिलांच्या मुखातून निघालेल्या मंत्रोच्चारांनी अवघा गड परिसर दुमदुमून गेला होता. आजच्या धावपळीच्या युगात कुलदेवतेची उपासना, तिची सेवा आणि धार्मिक परंपरांचे जतन व्हावे, या उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हा उपक्रम श्री स्वामी समर्थ महाराजांच्या संकेतानुसार प.पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.

भाविकांच्या सोयीसाठी विंचूर येथील श्रीराम मंदिरापासून लोनजाई माता गड परिसरापर्यंत मोफत वाहन व्यवस्था करण्यात आली होती. तसेच ज्या भाविकांकडे ग्रंथ उपलब्ध नव्हता, त्यांच्यासाठी नाममात्र दरात दुर्गा सप्तशती ग्रंथ उपलब्ध करून देण्यात आला होता. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी श्री लोणजाई माता भक्तगण मंडळ (विंचूर) व निफाड तालुका स्वामी सेवेकरी परिवाराने विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमास स्थानिक सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पत्रकार तसेच सुभाषनगर येथील ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# प्लाज्मा शाळेच्या स्काउट्स गाईडनी घेतले आपत्ती व्यवस्थापनचे प्रशिक्षण



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१६, नागपूर :** प्लाज्मा स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, खापरखेडा येथे राष्ट्रीय आपत्ती मोचन बल, अकॅडमी नागपूर यांच्या अंतर्गत आयोजित एक दिवसीय 'आपत्ती व्यवस्थापनचे प्रशिक्षण शिबिर' मध्ये शाळेच्या जवळपास २७० स्काउट्स आणि गाईड्स यांनी सहभाग घेतला.

या एक दिवसीय 'आपत्ती व्यवस्थापनचे प्रशिक्षण शिबिर' मध्ये राष्ट्रीय आपत्ती मोचन बल, अकॅडमी नागपूरचे निरीक्षक जोगराज शर्मा, एच. सी. सुनिल रामटेके, एच. सी. नवीन जोशी, सी.टी./एम. काजल अलबतु, एफ. टी. जितेश सैन आणि अन्य प्रशिक्षक यांनी स्काउट्स गाईड्स यांना भूकंप, पूर स्थिती, प्रथमोपचार मध्ये, विविध प्रकारचे बैंडेजेस, कृत्रिम श्वास प्रणाली (CPR), फायर फाइटिंग, विविध प्रकारचे फ्लोटिंग डिवाइसेस, आगीचे प्रकार आणि अग्निशमक यंत्राचे प्रकार व त्यांचे तांत्रिक रित्या वापर करण्याची पद्धत, आपातकालीन परीस्थिती इत्यादी आपत्ती व्यवस्थापनच्या विषयांवर सविस्तर माहिती आणि प्रात्यक्षिक करून दाखविले.

या प्रशिक्षण शिबिरासाठी संस्थेचे अध्यक्ष पृथ्वीराज बोरकर, मुख्याध्यापिका लैला वर्गीस, उपमुख्याध्यापिका तनुश्री भट्टाचार्य, स्काउट मास्टर शेखर कोलते, शिक्षिक वर्ग आणि कर्मचारी वर्ग यांनी मोलाचे सहकार्य केले.

## थोडक्यात बातम्या

# माधवराव पाटील महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१६, पालम (परभणी) :** पालम येथील माधवराव पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारताचे माजी राष्ट्रपती, ज्येष्ठ शास्त्रज्ञ व 'मिसाईल मॅन' म्हणून ओळखले जाणारे डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, ज्ञानाची व्याप्ती वाढविणे तसेच वाचनसंस्कृती रुजविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

यानिमित्ताने महाविद्यालयात विविध विषयांवरील पुस्तकांचे ग्रंथप्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्यावर आधारित पुस्तके, चरित्रे, विज्ञानविषयक साहित्य, स्पर्धा परीक्षा, साहित्य, इतिहास, समाजशास्त्र तसेच व्यक्तिमत्त्व विकासाशी संबंधित पुस्तके मांडण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रदर्शनाला भेट देत विविध पुस्तकांचे अवलोकन केले.

यावेळी विद्यार्थ्यांना नियमित वाचनाची सवय लावणे, पुस्तकांच्या माध्यमातून विचारशक्ती विकसित करणे आणि ज्ञानार्जनाची प्रक्रिया अधिक व्यापक करणे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. 'वाचनातून ज्ञान, ज्ञानातून प्रगती' हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी ग्रंथप्रदर्शनास भेट देऊन विविध पुस्तकांचे वाचन केले. डॉ. कलाम यांच्या विचारांचा आणि त्यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाचा विद्यार्थ्यांनी परिचय करून घेतला. त्यांच्या साधेपणा, वैज्ञानिक दृष्टिकोन, मेहनत आणि देशसेवेच्या भावनेतून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

यावेळी प्राचार्य डॉ. आत्माराम आरसुळे, ग्रंथपाल डॉ.घ.ना.पांचाळ, प्रा.उद्धव निर्वळ, प्रा.कालिदास गुडदे, प्रा.सोनटक्के यांच्या सह प्राध्यापक, विध्यार्थी, उपस्थित होते.

# कामठीत धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नालंदा स्पोर्टिंग अँड कल्चरल क्लबची भव्य धम्म रॅली



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१५, नागपूर :** धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या शुभमुहूर्तावर कामठी येथील नालंदा स्पोर्टिंग अँड कल्चरल क्लबतर्फे भव्य व शांततामय धम्म रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुनील वाघमारे यांच्या प्रमुख नेतृत्वात ही रॅली काढण्यात आली. याप्रसंगी हरीश वासनिक, रावम, आतिश चव्हाण, नीलेश मेश्राम, विपीन गायकवाड, संजय तोटे, अजय देशभ्रतार, विशाल वाघमारे, पायेश गेडाम, आतिश मेशाम, बॉबी वासनिक, संजय मश्राम, शेखर बनसोड आदीसह शेकडो कार्यकर्ते रॅलीत सहभागी झाले होते.

सायंकाळी ६ वाजता सुरू झालेली ही रॅली कामठी शहरातील विविध प्रमुख रस्त्यांवरून फिरली. रॅलीत मोठ्या संख्येने भाविकांनी उत्साहाने आणि भक्तीभावाने सहभाग घेतला. बोधी वृक्ष आणि सुंदर सजवलेल्या रथावर ठेवलेली भगवान बुद्धांची मूर्ती हे रॅलीदरम्यान आकर्षणाचे केंद्र राहिले. शहराचा दौरा केल्यानंतर ही रॅली रात्री १० वाजता मोदी पाडाव येथील नालंदा चौकात पोहोचली, जिथे भक्तीपूर्ण वातावरणात शांततेत तिची सांगता झाली. स्थानिक नागरिकांनी आणि बौद्ध समाजाने क्लबच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

# लोकमान्य टिळक कन्या विद्यालयात 'वाचन प्रेरणा दिन' साजरा



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** लोकमान्य टिळक स्मारक मंडळ, चंद्रपूर द्वारा संचालित लोकम ान्य टिळक कन्या विद्यालय चंद्रपूर येथे भारताचे माजी राष्ट्रपती आणि थोर शास्त्रज्ञ डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती ' वाचन प्रेरणा दिन ' म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला शाळेच्या मुख्याध्यापिका प्रांजली महादाणी यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करुन माल्यार्पण करण्यात आले. तसेच पर्यवेक्षक दिपक गावंडे, ज्येष्ठ शिक्षक कळस्कर सर, पेटकर सर आणि शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनीही प्रतिमेला पुष्प अर्पण केले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थिनींमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, वाचन संस्कृती जोपासणे, पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञानाचा विस्तार करणे तसेच याप्रसंगी विद्यार्थिनींना नियमित वाचनाचे महत्व पटवून देण्यात आले. पुस्तकांमुळे ज्ञानात भर पडते. विचारशक्ती विकसित होते आणि व्यक्तिमत्व घडण्यास मदत होते असे मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षा शाळेच्या मुख्याध्यापिका प्रांजली महादाणी मॅडम नी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. विद्यार्थिनींनी काही पुस्तकांचे यावेळी वाचन केले. प्रीती भट मॅडम नी पुस्तकांचे वाचन केले. तसेच सहायक शिक्षक अनिल पेटकर सरांनी यावेळी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन मृणाल पनके मॅडम नी केले.